IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार व कार्य

**डॉ.ताराचंद माधव सावसाकडे**

**प्रमुख, राज्यशास्त्र विभाग**

**धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर जि. जळगाव**

**Mob:- 8055438704**

Email:- tara_sawsakade@rediffmail.com

**सारांशः-**

ज्ञान हा मानवी आयुष्याचा पाया आहे. मानवी आयुष्य सतत वृध्दींगत होण्यासाठी ज्ञान हा पायाभूत घटक आहे. त्यामुळे शिक्षणाच्या प्रसाराला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अधिक महत्व दिले. यासोबतच विद्यार्थी, शिक्षक, शिक्षणसंस्था यांना अनमोल असा सल्ला देवून भारतीय राज्यघटनेत शैक्षणिक तरतूदी करून शिक्षणाच्या प्रसारासाठी कार्य केले. आज भारतीय शिक्षणव्यवस्थेत बदल करण्यासाठी अलिकडेच राष्ट्रीय शिक्षण धोरण मंजूर करण्यात आले. या शैक्षणिक धोरणानूसार येणा-या काळात डीजीटल शिक्षणपध्दतीचाही अवलंब केला जाणार आहे. ज्यातून डिजीटल साधना अभावी गोरगरीब विद्यार्थी शिक्षण घेऊच शकणार नाही. या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अशा असंख्य गोष्टी आहेत. ज्यामुळे समाजव्यवस्थेत विषमतेचे बुरूज अधिक मजबूत होतील. युनोस्कोच्या एज्युकेशन फॉर ऑल २०१३ च्या अहवालानुसार १९१ देशामध्ये शिक्षणाच्या प्रगतीमध्ये भारताचा क्रमांक १४५ वा आहे. येवू घातलेल्या शैक्षणिक धोरणाचा विचार केला असतांना भारत देशात उच्च शैक्षणिक क्षेत्रात मोठी मजल मारेल असे वाटत नाही. त्यामुळे प्रस्तुत शोध निबंधातून डॉ.बाबासाहेब आंबेड्कराच्या शिक्षण विषयक विचार व कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**मुळ शब्दः-** अस्पृश, विद्याथी, शिक्षण, विचार, शिलवान,राष्ट्रीय एकात्मता

## I. INTRODUCTION

I. कुठल्याही मानवी समाजाला विकासपर्वाकडे नेण्याचे काम शिक्षणामुळेच होत असते.सामाजिक न्याययावर आधारित सामाजिक परिवर्तन केवळ शिक्षणाने येऊ शकते. शिक्षण हेच सामाजिक क्रांतीचे साधन आहे. शिक्षण नसल्यास माणूस गुलाम होण्यास वेळ लागत नाही. त्यामुळे शिक्षण प्रत्येकाला

मिळाले पाहिजे. शासनाने ही जबाबदारी घेऊन सक्तीचे आणि मोफत शिक्षण दिले पाहिजे. माणसाला माणूस म्हणून जगण्याची जाणीव शिक्षणातून निर्माण होते. शिक्षणाने हीच जाणीव दिली पाहिजे. या मताचा सतत आग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धरला.

II. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाच्या बळावर संपूर्ण विश्वात वेगळी ओळख निर्माण करून भारतीय समाजव्यवस्थेत अस्पृश्य समजल्या गेलेल्या समाजाला सन्मानाचा दर्जा प्राप्त करून दिला. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही ही त्यांची कायम भूमिका राहिली आहे. डॉ. आंबेडकरांनी अशिक्षित, दुर्लक्षित, दलित अस्पृश्य समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगितले. शिक्षणाच्या अभावामुळे आपला दर्जा कसा खालावला आहे, याचे भान करून दिले. गरीब- पद्दलित समाजातील मुलांनी - मुलींनी उच्च शिक्षण घ्यावे यासाठी त्यांनी आयुष्यभर धडपड केली. मुंबईत सिद्धार्थ तर औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना पीपल्स एज्युकेशन सोसायटी अंतर्गत केली. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत मिळावे यासाठी भारतीय राज्यघटनेत कायदा केला. शिक्षणाप्रती त्यांच्या प्राणांतिक लढा होता. शिक्षण व विद्या या गोष्टींशिवाय आपला उध्दार होणार नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यामुळेच इतिहासकार धनंजय कीर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल म्हणतात, 'या युगातील पहिल्या श्रेणीतील अलौकिक पुरुषांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्थान आहे. जगात आजवर जे पददलितांचे रक्षणकर्ते व कैवारी होऊन गेले त्या सर्वांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्थान उच्च आहे.

**मुळ शब्दः-** अस्पृश, विद्याथी, शिक्षण, विचार, शिलवान,राष्ट्रीय एकात्मता

**उद्दीष्टेः-**

१. डॉ.बाबासाहेबांच्या शिक्षण या संकल्पनेचा अभ्यास करणे.

२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण विषयक विचार अभ्यास करणे.

३. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांसाठी केलेल्या शिक्षणाच्या सोयीचा आढावा घेणे.

४.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणासंदर्भात भारतीय संविधानात केलेल्या तरतूदींचा शोध घेणे.

**गृहीतकेः-**

१. शिक्षण हाच जीवनाच्या प्रगतीचा मार्ग आहे.

२. मनुष्याच्या जीवनात आमुलाग्र परीवर्तन घडवून आणू शकते, यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विश्वास होता.

३. शिक्षणासाठी पीपल एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून सिद्धार्थ, मिलिंद महाविद्यालये व इतर शैक्षणिक संस्था सुरू केल्या.

४. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात शिक्षणाचा मुलभूत अधिकाराची तरतूद केली.

## शिक्षण विषयक विचार व कार्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक शैक्षणिक तत्वज्ञानी होते. त्यांच्या शैक्षणिक सिद्धांताची पाळेमुळे त्यांच्या तत्वज्ञानात रूतलेली असल्याचे आपल्याला दिसून येते. त्यांच्या मते शिक्षण म्हणजे प्रज्ञा, करूना, शील, व मैत्री यांचे एकीकरण होय.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला अन्नाची व शक्तीची उपमा दिली.अन्नाशिवाय मनुष्य जगू शकत नाही.अन्नाशिवाय कोणत्याही शक्तीचा संचार होत नाही.तसेच शिक्षणाचे आहे. शिक्षणातून मन व शरीर सुदृढ राहण्यास मदत होते. शिक्षण व मनुष्य यांचा संबंध त्याच्या जन्मापासून असल्यामुळे शिक्षण हा त्याच्या अस्तित्वाचा विषय ठरतो असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. 'ज्याप्रमाणे माणूस जगावयाचा असल्यास त्याला अन्नाची आवश्यकता असते तशीच विद्येची आवश्यकता असते ज्ञानाशिवाय तो काहीच करू शकत नाही. माणसाकरिता शिक्षण हेच सर्व काही असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानतात.[१] शिक्षणातून प्रज्ञा, करुणा, शील, व मैत्री या पंचतत्त्वानुसार व्यक्तीला स्वतःचे चरित्र संवर्धन करता आले पाहिजे. शिक्षणाचा मूळ उद्देश शुध्द चरित्र्याची निर्मिती असला पाहिजे. जे त्यातून मानवी सभ्यता व संस्कृतीचा पाया रचला जातो. शिक्षण म्हणजे ज्ञान परिवर्तन व अस्तित्वाची ओळख करून देणारे आणि मागासलेपण दूर करण्याचे प्रभावी साधन इतकेच नाही, तर सामाजिक विषमता नष्ट करून सुदृढ समाजव्यवस्थेची मुहूर्तमेढ होण्याकरिता प्रथम क्रांतीची मशाल बनवून नंतर ते सामाजिकतेला पथदर्शक दिपस्तंभ ठरते.

डॉ.आंबेडकर आपले शैक्षणिक सूत्र शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा या तीन शब्दात मांडतात. शिक्षण हे विकासाचे सरळ व सोपे साधन राहत नसून ते सामाजिक आर्थिक व राजकीय अवरोध नष्ट करून आमूलाग्र परिवर्तनाकडे घेवून जाणारा महान मार्ग आहे. जगाची पुनर्रचना करण्यासाठी शिक्षण हे आमूलाग्र परिवर्तनातील एक महान प्रक्रिया आहे. केवळ शिक्षण घेतले म्हणजे ती योग्यता आपणास येते असे त्यांना वाटत नव्हते. मनुष्य विद्वान झाला की तो समाजाला उपयुक्त होतोच असे नाही. विद्वान मनुष्य लुच्चा, लबाड, उसण्या, लटपट्या आणखी वाटेल त्या दुर्गुणांचा असतो. आजच्या परिस्थितीत विद्वान, शिकलेले पुढारलेले हे अस्पृश्यांचे कसे वागतात हे आपण पाहतच आहोत. अस्पृश्यता निवारण्याचे अनेक मार्ग आहेत.[२] त्यासाठी व्यक्तीत ज्ञान असले पाहिजे, त्यासाठी शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे. अस्पृश्यानी फार जागृत राहून संधी प्राप्त करून घेणे आणि ती पदरात पाडून घेणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या अभावी हेतू साध्य होत नाही.[३] आज समाजात अत्यंत निकडचे असे कोणते कार्य असेल तर ते शिक्षण प्रसार हे होय. प्रसारक समाज तसेच प्रत्येक संस्थेने शिक्षणाच्या बाबतीत आपल्या तरुण पिढीचे पाऊल कसे पुढे पडेल या प्रश्नांकडे आपले लक्ष पुरविले पाहिजे व त्या दिशेने आपल्या कार्याची दिशा ठरविली पाहिजे.[४] आपला व्यक्तिविषयक लौकिक वाढविणे व त्याबरोबरच आपल्या समाजाची योग्यता वाढवणे हे केवळ शिक्षणावर अवलंबून आहे.

आज कायद्याने जरी अस्पृश्य समाजाकरिता सरकारी नोकरीत प्रमाण ठरवून दिले असले तरी योग्य ते शिक्षण घेऊन अंगी लायकी प्राप्त करून घेतल्याशिवाय शक्य होणार नाही.[५] विद्यार्थी दशेत विद्यार्थ्यांनी निरंतर ज्ञानार्जन हे एकच ध्येय ठेवावे, विद्यार्थीदशेतच प्रयत्नांची पराकाष्टा करून ज्ञान संपादन करावे. "ज्ञानार्जन" व

"निरंतर ज्ञानार्जन" या तत्त्वांची पूर्ण जाणीव ठेवून शिक्षण प्राप्ती हेच आपले सध्याचे ध्येय ठेवावे असे त्यांनी विद्यार्थ्यास मोठ्या कळकळीने सांगितले. समाजातील तसेच अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी ज्या प्रमाणे उच्च वर्गाचे लोक आपल्या मुलांना शिक्षण देतात, त्याचप्रमाणे आपल्या मुलांना शिक्षण देण्याची गरज आहे.[६] दीनदुबळ्या, स्पृश्य समाजाच्या जुलमाने त्रस्त झालेल्या अडाणी समाजाच्या कार्याचा बोजा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिरावर घेतला होता. त्या कार्यामुळे विद्यार्थ्यांकडे जितके लक्ष द्यावयास हवे होते. तेवढे देता आले नाही. अर्थात त्याचा अर्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थ्यांच्या वृद्ध होते असे नाही. उलट ते घरी राजकारणात समाजकार्यात पडले असले तरी त्यांनी " मी आजन्म विद्यार्थी आहे, तेव्हा विद्यार्थ्याला विद्यार्थ्या विरुद्ध कसे राहता येईल. अडाणी आई-वडिलांच्या पोटी जन्म घेतला म्हणून त्याबद्दल दुराभिमान बाळगू नका आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून जपून अभ्यास करा."[७] असा विद्यार्थांना सल्ला दिला.आत्मविश्वासाचा सारखी दुसरे दैवत शक्ती नाही विद्यार्थांनी आत्मविश्वास गमावता कामा नये. विद्या बरोबरच विद्यार्थ्यांमध्ये शील असले पाहिजे. शीला शिवाय फुकाचे आहे. कारण विद्या एक शास्त्र आहे. एखाद्याजवळ विद्येचे शास्त्र असेल व तो शीलवान असेल, तर त्यायोगे एखाद्याचे संरक्षण करील. तर तोच व्यक्ती शील नसेल तर विद्येच्या शस्त्राने दुसऱ्यांचा घात करील. विद्या ही तलवारीसारखी आहे. परंतु तिचे महत्व तिला धारण करणाऱ्या वर अवलंबून राहील कारण अडाणी मनुष्य कोणास फसवू शकत नाही. फसवावे कसे हेच त्याला समजत नाही. परंतु शिकल्या सवरलेल्या लोकांच्या ठिकाणी कोणास कसे फसवावे व त्या फसविण्यासाठी लागणारा युक्तिवाद असल्याने खऱ्याचे खोटे व खोट्याचे खरे भासवू शकतात.[८] म्हणून शिकल्या सवरलेल्या लोकांत शीलाची अत्यंत जरुरी आहे. जर शिकलेले सवरलेले लोक निपजू लागले तर त्यांचा शिक्षणातच, समाजाचा व राष्ट्राचा नाश आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे ध्येय धोरण जाहीर करतांना म्हटले की, संस्थेचा हेतू केवळ शिक्षण देण्याचाच नाही, तर विद्यार्थ्यांना शिक्षण अशा पद्धतीने द्यायचे की, त्यामुळे आपल्या देशात बौद्धिक सामाजिक व नैतिक लोकशाहीचा प्रचार करता येईल. विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास होण्यासाठी खेळ आणि व्यायाम याकडे खास लक्ष, त्यासोबतच शास्त्रीय आणि बौद्धिक विकासाकडे लक्ष, औद्योगिक आणि संशोधन संस्थांच्या भेटीची व्यवस्था, वाद-विवाद, वाङःमय आणि सायन्स अशी मंडळी स्थापन करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे यावर भर दिला. केवळ विद्यार्थ्यांनाच नाही तर जनतेला ही शिक्षण देण्यावर भर दिला.[९] १५ डिसेंबर १९५२ रोजी एल्फिन्स्ट्न कॉलेजमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण झाले त्यात त्यांनी विद्यार्थ्यांनी काय शिकावं हे विद्यापीठ ठरवित असले, तरी आपल्या बौद्धिक विकासालाआपण शिकतो ते खरोखरच पोषक व आवश्यक आहे की नाही, हे प्रत्येक विद्यार्थ्यांनी पाहिले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाची उभारणी विद्यापीठीय शिक्षणात होत असते. विद्यार्थी राष्ट्राचा आदर्श नागरिक होणार की, त्याचे जीवित विफल होणार हेही शिक्षणक्रम ठरविणार असल्यामुळे विद्यापीठाच्या प्रत्येक हालचालीवर विद्यार्थ्यांनी लक्ष ठेवले पाहिजे.[१०] विद्यार्थ्यांनी प्लेटो,बेकन, नित्से, स्पिनोझा यासारख्या महाश्रेष्ठ तत्त्वज्ञान्यांच्या तत्त्वज्ञानासंबंधीच्या गोष्टी विद्यार्थ्यांनी स्वतः ओळखायला पाहिजे आणि आपल्याला योग्य शिक्षण पाहिजे याचा आग्रह त्यांनी केला पाहिजे.

त्यासोबतच भारतीय विद्यार्थ्यांनी नवनव्या निर्माण होणाऱ्या मानवी जीवनातील वैचारिक आणि जीवनमूल्यांची दखल घेऊन ती आचरणात आणण्यास सिद्ध राहिले पाहिजे.[११] अशा प्रकारचे नवे तत्त्वज्ञान शिक्षणसंस्था, महाविद्यालय आपल्या शिक्षणक्रमात घालतात की नाही, याकडेही पाहिले पाहिजे. विद्यार्थ्यांनीची बौद्धिक पातळी का खालावलेली आहे, याचा विचार करणे गरजेचे आहे. शिक्षणाने नवी दृष्टी येते, या दृष्टीने विद्यार्थ्यांनी खऱ्या जीवनमूल्यांचा शोध व बोध घ्यावा. फी वाढीवर लक्ष ठेवावे या फी अशाच वाढू लागल्या तर विद्यार्थ्यांच्या भावी जीवनावर त्यांचा निश्चितपणे अनिष्ट परिणाम होईल. विद्यार्थी वर्गाला जर ज्ञानाची कास धरून आपल्या देशाचा विकास आणि उद्धार करून घ्यावयाचा असेल तर त्यांनी विद्यापीठाच्या कारभारात जरूर लक्ष घालून आपल्या हक्कासाठी सतत झटत राहिले पाहिजे. विद्यापीठाचा कारभार चालवणारी सिनेटमध्ये बसलेली ही क्रिया शून्य माणसे गेल्याशिवाय विद्यापीठाचा कारभार सुधारणार नाही. म्हणून विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा कारभार जातीने पाहिला पाहिजे व आपले हित साधले पाहिजे[१२]असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दारूबंदी पेक्षा शिक्षणाचा प्रश्न किती महत्त्वाचा आहे.हे सांगताना ग्रेट ब्रिटन, आयर्लंड, कॅनडा, नार्वे वगैरे देशातील लोकसंख्या व तेथील दारूच्या उत्पन्नाचे आकडे देऊन मुंबई इलाख्याचा दारूबंदीचा प्रश्न इतका तातडीचा नाही हे सिद्ध करून दाखवले. या प्रश्नांपेक्षा अधिक महत्त्वाचा असा शिक्षणाचा प्रश्न जरुरीचा आहे. त्यासाठी त्यांनी मुंबई इलाख्यात साक्षरतेचे प्रमाण किती कमी प्रतीचे आहे हे आकडे देऊन ऊन स्पष्ट केले. त्यावेळी पुरुष शेकडा १४.३% व स्त्रिया फक्त २.४% साक्षर होते म्हणजे शेकडा पुरुष ८६ व स्त्रिया ९८ असे निरक्षरतेचे प्रमाण त्यांनी सिद्ध केले. शिक्षणाचे महत्त्व पटवून देत असताना मुन्सिपल कामगारांसाठी त्यांनी " तुम्ही तुमच्या मुला-मुलींना शिक्षण देऊन तुम्ही जे काम करता, त्या कामात त्यांना पडू न देण्याची खबरदारी घ्यावी."[१४] असा सल्ला दिला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उच्च शिक्षणाकडे फार व्यापक अंगाणे पाहत असत. मनुष्याच्या जीवनात उच्च शिक्षण आमूलाग्र परिवर्तन घडून आणू शकते यावर त्यांचा ठाम विश्वास होता. मुंबई विद्यापीठ, कोलंबिया विद्यापीठ, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स यासारख्या या विद्यापीठातून बाबासाहेबांनी उच्च शिक्षण घेतले असल्यामुळे त्यांना उच्च शिक्षणाच्या सामर्थ्याची पुरेपुर कल्पना होती. देशाला बलवान करायचे असेल तर उच्च शिक्षणाशिवाय पर्याय नाही, ही धारणा बाबासाहेबांची होती.उच्च शिक्षण तळागाळापर्यंत पोहोचले पाहिजे, सर्वांना उच्च शिक्षण उपलब्ध झाले पाहिजे याकडे त्यांचा कटाक्ष होता. प्राध्यापकांनी शिक्षण देण्याच्या कार्यासोबतच संशोधनाचे कार्य करावे. प्राध्यापकांनी अध्ययन व अध्यापनाच्या कार्यासाठी स्वतःला इतके वाहून घ्यावे की आपल्या घराकडे बघायला मुळीच सवड मिळता कामा नये. घरातील सर्व जबाबदारी पत्नीवर सोपवावी. अध्ययन अध्यापन यांबरोबरच संशोधनाचे कार्य हाती प्राध्यापकांनी घेतले पाहिजे[१५] असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे होते. मुंबईत जुलै १९५६ पासून संसदीय शिक्षण देणारी एक आदर्श संस्था ट्रेनिंग स्कूल फार पॉलिटिक्स ची स्थापना केली होती. त्यात राजकारण अर्थशास्त्र अंदाजपत्रक कामगार संघटना संसदीय कामकाज विषयक नियम आणि परंपरा इत्यादी आवश्यक विषयांबरोबरच वक्तृत्व स्वाद साधनेला प्राधान्य दिले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून शैक्षणिक आरक्षणाची सोय केल्यामुळे देशातील दलित पीडित शोषित समाज उच्च शिक्षण घेऊ शकला त्यामुळे मोठ्या हुद्यावर तो पोहोचू शकला. यासोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटने मध्ये काही शैक्षणिक तरतुदी केल्या. त्यामध्ये कलम २८ -१ नुसार कोणत्याही सरकारी शिक्षण संस्थेत धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही. कलम २९ -२ नुसार त्याचबरोबर सरकारमान्य किंवा सरकारी मदत मिळणार या खाजगी संस्थांतून धार्मिक शिक्षण देता येईल पण त्याबाबत शक्ती करता येणार नाही. कलम ३०-१ नुसार धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याच्या व त्यांचे प्रशासन करण्याचा हक्क असेल. कलम ३०-२ नुसार शैक्षणिक संस्थांना सहाय्य देताना राज्य, एखादी शैक्षणिक संस्था ही धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या एखाद्या वर्गाच्या व्यवस्थापनाखाली आहे या कारणावरून तिला प्रतिकूल होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही. कलम २१-क नुसार राज्य हे सहा वर्षापासून १४ वर्षापर्यंत च्या मुलांना कायद्याने ठरविलेल्यानुसार शिक्षण देईल. कलम ४१- राज्य हे आपली आर्थिक समता व विकास यांच्या मर्यादेत कामाचा शिक्षणाचा हक्क आणि बेकारी वार्धक्य आजार व शारीरिक अपंगत्वाने पीडित अशा व्यक्तीच्या बाबतीत आणि काही अपराध नसताना हलाखीचे जिणे ज्यांच्या वाट्याला आले आहे अशा अन्य व्यक्तींच्या बाबतीत लोकसाहित्याचा हक्क उपलब्ध करून देण्यासाठी परिणामकारक तरतूद करेल. कलम ४५- राज्य , सर्व बालकांसाठी , त्यांच्या वयाची सहा वर्षे पूर्ण होईपर्यंत, प्रारंभिक बाल्यावस्थेतील देखभाल आणि शिक्षण यांची तरतूद करण्याकरिता प्रयत्न करील. कलम ४५- सहा वर्षाखालील बालकांचे संगोपन व त्यांच्या शिक्षणाची तरतूद. कलम ४६- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर दुर्बल घटक यांचे शैक्षणिक आणि आर्थिक हितसंवर्धन सरकार करेल,आणि सामाजिक अन्याय व इतर सर्व प्रकारच्या शोषणापासून संरंक्षण करेल.कलम ५१-प्रत्येक पालकांचे कर्तव्य असेल की आपले ६ ते १४ वयोगटातील पाल्यांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देतील.कलम ३३७ आंग्लभारतीय समाजाच्या लाभाकरता शैक्षणिक अनुदानांबाबत विशेष तरतूद.कलम ३५० प्रयेक राज्य आणि राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकारी, भाषिक अल्पसंख्याक समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षण देण्याच्या पर्याप्त सोयी उपलब्धं करून देण्यासाठी प्रयत्नशील राहील. आणि अशा सोयी पुरवणे शक्य व्हावे. यासाठी राष्ट्रपती स्वत:ला आवश्यक किंवा योग्य वाटतील असे निदेश कोणत्याही राज्याला देऊ शकेल.[१६]

**निष्कर्ष-**

डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचाराने विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्य, चरित्र संवर्धन करून सामाजिक समता व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागून लोकशाही बळकट करता येते. त्यांच्या शैक्षणिक विचारातून मानवी मूल्य, मानवी हक्क, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या गोष्टी दिसून येतात. त्यांच्या शैक्षणिक विचारातून समाजातील आर्थिक आणि राजकीय विषमता कमी होऊ शकते. समाजाला गतीमान करण्यासाठी पोषक विचारांची, सिद्धांतांची आवश्यकता असते आणि हे पोषक विचार सिद्धांत डॉ. आंबेडकरांनी दलित समाजातील

सर्वांना दिले. त्यांना अभिप्रेत असलेल्या शिक्षण, शिक्षणसंस्था, शिक्षण पद्धती, सरकारचे शिक्षणासंबंधी चे कर्तव्य इत्यादी बाबीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले परखड मत देवून संविधानात शिक्षणविषयक तरतूदी केल्या. त्यामुळेच आज दलित आदिवासी समाजात क्रांतीकारी परीवर्तन होतांना दिसून येते. त्या काळाच्या संदर्भात मांडलेले हे विचार आजच्या काळातही लागू पडताना आपल्याला दिसतात त्यांनी दिलेले सावधगिरीचे इशारे आजही आपल्याला सावध करतात यातून त्यांची दूरदृष्टी दिसून येते.भारतीय शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मंजूर करण्यात आले. या धोरणामुळे ग्रामीण आदिवासी डोंगराळ भागात वास्तव्य करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होणार आहेत. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षण विषयक विचाराची आवश्यकता दिसून येते.

**निष्कर्ष-**

डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचाराने विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्य, चरित्र संवर्धन करून सामाजिक समता व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागून लोकशाही बळकट करता येते. त्यांच्या शैक्षणिक विचारातून मानवी मूल्य, मानवी हक्क, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या गोष्टी दिसून येतात. त्यांच्या शैक्षणिक विचारातून समाजातील आर्थिक आणि राजकीय विषमता कमी होऊ शकते. समाजाला गतीमान करण्यासाठी पोषक विचारांची, सिद्धांतांची आवश्यकता असते आणि हे पोषक विचार सिद्धांत डॉ. आंबेडकरांनी दलित समाजातील सर्वांना दिले. त्यांना अभिप्रेत असलेल्या शिक्षण, शिक्षणसंस्था, शिक्षण पद्धती, सरकारचे शिक्षणासंबंधी चे कर्तव्य इत्यादी बाबीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले परखड मत देवून संविधानात शिक्षणविषयक तरतूदी केल्या. त्यामुळेच आज दलित आदिवासी समाजात क्रांतीकारी परीवर्तन होतांना दिसून येते. त्या काळाच्या संदर्भात मांडलेले हे विचार आजच्या काळातही लागू पडताना आपल्याला दिसतात त्यांनी दिलेले सावधगिरीचे इशारे आजही आपल्याला सावध करतात यातून त्यांची दूरदृष्टी दिसून येते.भारतीय शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मंजूर करण्यात आले. या धोरणामुळे ग्रामीण आदिवासी डोंगराळ भागात वास्तव्य करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होणार आहेत. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षण विषयक विचाराची आवश्यकता दिसून येते.

**संदर्भसुचीः-**


१) डी.वाय हाडेकर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विज्ञान, सुगावा प्रकाशन पुणे,२००५ पृ.२९.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग १ पृष्ट १८२.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग १ पृष्ट १८४.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग १ पृष्ट ३०८.

५) कित्ता.

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग १ पृष्ट २३५.

७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग २ पृष्ट १९०.

८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग २,पृष्ट १९३.

९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग ३,पृष्ट २४०

१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग ३,पृष्ट ३२२

११) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग ३,पृष्ट ३२३

१२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग ३,पृष्ट ३२४

१३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग २,पृष्ट २५६

१४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग २,पृष्ट ३७७

१५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग ३,पृष्ट ६६

१६) Indian Constitution